**ठळक बातम्या**

- शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचं राज्यपालांच्या हस्ते वितरण
- भारतीय वायूसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार
- मुलींच्या युरोपियन गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत भारतीय संघाला २ रौप्य, २ कांस्य पदक

**आणि**

- जेईई मेन ची उत्तरसूची जारी, उद्या निकाल जाहीर होणार

**<><><><><>**

महाराष्ट्राचा इतिहास पाहता उद्योग, शिक्षण, सामाजिक सुधारणा किंवा क्रीडा क्षेत्र असो महाराष्ट्रानं देशाचं अनेक क्षेत्रात नेतृत्व केलं आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. पुण्यात बालेवाडी इथे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचं राज्यपालांच्या हस्ते वितरण करण्यात आलं तेव्हा ते बोलत होते.

शिवछत्रपतींचं नाव या पुरस्काराच्या माध्यमातून खेळाडूंच्या नावासोबत लागत आहे, तेव्हा हा पुरस्कारप्राप्त खेळाडूंनी, प्रशिक्षक या सर्वांनीच आपली भूमिका ठरवून खेळाच्या आणि खेळाडूंच्या विकासासाठी आपलं पूर्ण योगदान देण्याची मानसिकता बाळगावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं. महाराष्ट्रातल्या खेळाडूंचं अभिनंदन करताना ते म्हणाले…

**होल्ड - बाईट (देवेंद्र फडणवीस)**

सर्वच पुरस्कारार्थींनी त्यांच्या खेळावरचं प्रेम, मेहनत आणि क्रीडा कौशल्याने क्रीडा क्षेत्राचा आणि देशाचा गौरव वाढविला आहे. बॅडमिंटन पटू व उत्तम खेळाडूंच्या पिढ्या घडविणारे उत्तम प्रशिक्षक म्हणून प्रदीप गंधे आणि कबड्डीपटू शकुंतला खटावकर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे ही आनंदाची बाब आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. शकुंतला खटावकर यांचं अभिनंदन करताना अजित पवार म्हणाले...

**होल्ड बाईट - अजित पवार**

या कार्यक्रमात राज्यातल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केलेल्या खेळाडू, संघटक, प्रशिक्षकांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

**<><><><><>**

राज्य सरकारच्या सहकार्याने आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि क्रांतिवीर चापेकर बंधू स्मारक समितीच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या क्रांतिवीर चापेकर बंधू स्मारकाचे लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाला दूरदृश्यप्रणालीद्वारे संबोधित केलं.

**<><><><><>**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतल्या अंगीकृत रुग्णालयांची संख्या १ हजार ७९२

वरून ४ हजार १८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या योजनेतल्या उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे उपचार समाविष्ट करणं, तसंच प्राथमिक आरोग्य सेवा योजनेत समाविष्ट करण्यासाठी समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. तसंच अपघातग्रस्त रुग्णांसाठी १ लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्योजकांशी संवाद साधला. दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर- डीएमआयसी प्रकल्पाच्या विस्तारासाठी आणखी आठ हजार एकर जमीन संपादित केली जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. या संवाद सत्रानंतर संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण झालं.

<><><><><>

केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेच्या तयारीचा आज आढावा घेतला. मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातल्या जिओ वर्ल्ड सेंटरचा विस्तृत दौरा केल्यानंतर त्यांनी या संदर्भात सहभागी असलेल्या विविध विभागांच्या प्रमुखांची एक बैठकही घेतली.

<><><><><>

महाराष्ट्रात राहणाऱ्या नवीन पिढीला मराठी आलीच पाहिजे असं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केलं आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये वार्ताहरांशी बोलत होते. ज्या पद्धतीने बहुतांश देशांमध्ये इंग्रजी बोलली जाते त्याचप्रमाणे तिन्ही भाषा बोलल्या पाहिजेत. आपण महाराष्ट्रात राहतो त्यामुळे आपल्या मातृभाषेला नंबर एकच स्थान आहे असं त्यांनी म्हटलं आहे.

हिंदी भाषेची सक्ती करण्याचा सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा असून सरकारनं हा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता आणि संस्कृती असून आपल्या संस्कृतीवरच घाला घालण्याचा प्रयत्न भाजपा करत असल्याची टीका त्यांनी केली. राज्यात मराठी सोडून इतर कोणत्याही भाषेची सक्ती करणं अयोग्य असून हिंदी बाबत करण्यात आलेली सक्ती सरकारने तातडीने मागे घ्यावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं केली आहे. सरकारनं हा निर्णय मागे न घेतल्यास या विरोधात राज्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पक्षानं दिला आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ मोहिमेचा भाग म्हणून भारतीय वायूसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहेत. ॲक्सिओम स्पेसच्या ए एक्स-४ या अंतराळ मोहिमेची सर्व तयारी झाली असल्याची माहिती इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांनी दिली आहे. या मोहिमेद्वारे भारत आपल्या अंतराळ क्षेत्रात एक निर्णायक अध्याय

लिहिण्याठी सज्ज असल्याचं अवकाश आणि अणुऊर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. येत्या काही महिन्यांतल्या इस्रोच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय भागीदारांसोबतचे सहकार्य आणि गगनयान सारख्या प्रकल्पांची धोरणात्मक गती अंतराळ तंत्रज्ञानात जागतिक नेता बनण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचं प्रतिबिंब असल्याचं त्यांनी म्हटलं.

<><><><>

भारतीय मुलींनी १४ व्या युरोपियन गर्ल्स मॅथेमॅटिकल ऑलिंपियाड स्पर्धेत २ रौप्य आणि २ कांस्य पदकं पटकावली. रौप्य पदक विजेत्या विद्यार्थिनींमध्ये केरळच्या संजना चाकोसह मुंबईच्या श्रेया मुंदडाचा समावेश असून कांस्य पदक विजेत्या विद्यार्थिनींमध्ये पुण्याच्या सई पाटीलचा तसंच कोलकताच्या श्रेया रे हिचा समावेश आहे. कोसोवोची राजधानी प्रिस्टिनामध्ये ११ ते १७ एप्रिल दरम्यान ही स्पर्धा झाली. भारतानं पहिल्यांदाच या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या प्रतिनिधी डॉ. मृदुल थत्ते तसंच चेन्नई गणितीय संस्थेच्या प्रतिनिधी अदिती मुधखोड आणि अनन्या रानडे यांनी या तुकडीचं नेतृत्व केलं.

<><><><>

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई तालुक्यात महिला वकिलाला सनगावचे सरपंच आणि त्याच्या साथीदारांनी मारहाण केल्याची घटना आज घडली. या महिलेनं ध्वनीप्रदूषणाची तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी सरपंचासह दहाजणांविरोधात युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेची गंभीर दखल राज्य महिला आयोगानं घेतली असून आरोपींचा शोध तातडीनं घेत त्यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश बीड पोलिसांना दिले आहेत.

<><><><><>

नाशिक इथं काठे गल्लीतल्या अनधिकृत प्रार्थनास्थळावर कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांवर झालेला हल्ला हा पूर्वनियोजित कटाचा भाग असल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ३० जणांना अटक केली असून मुख्य सुत्रधाराचा शोध सुरू आहे.

<><><><><>

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं आज जेईई मेन २०२५ सत्र-२ ची अंतिम उत्तरसूची अधिकृतपणे जारी केली.  परीक्षा दिलेले उमेदवार उत्तरसूची अधिकृत वेबसाइट jeemain.nta.nic.in वर पाहू शकतात. जेईई मेन सत्र-2 चा निकाल उद्या जाहीर केला जाईल, अशी माहिती एनटीएं दिली आहे. जेईई मेन्स 2025 सत्र-२ ची परीक्षा २ ते ९ एप्रिलदरम्यान घेण्यात आली होती.

<><><><><>

राज्यात गेल्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//